
SEED

Suresh Dada Scheme for
Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

16 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008

www.sdseed.in

# आमचे प्रेरणास्थान



आदरणीय श्री सुरेशदादा जैन

- ## ध्येय

  गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व उद्योजकीय कौशल्ये विकसित करून त्यांना जागतिक स्तरावर सक्षम बनविणे.

- ## उद्दिष्टे

  – विद्यार्थी, पालक व शिक्षकांमध्ये शिक्षणाचे महत्त्व आणि परिणामाबद्दल प्रबोधन करणे.
  – सर्व पात्र विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक व उद्योजकीय ध्येय गाठण्यासाठी आर्थिक मदत करणे.
  – विद्यार्थी, पालक व शिक्षकांना सक्षम बनविण्यासाठी नवनवीन उपक्रम विकसित करून ते अंमलात आणणे.
  – सर्व उपक्रमांना स्वयंपूर्ण बनविणे, ज्यायोगे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना त्यांचा लाभ मिळेल.

- ## कार्यक्षेत्र

  जळगाव जिल्ह्यातील सर्व जाती, धर्म, पंथातील इयत्ता 8वी व त्यापुढील विद्यार्थ्यांना एसडी–सीड योजनेंतर्गत कार्यक्रमांचा लाभ घेता येईल.

# पार्श्वभूमी

- आमचे प्रेरणास्थान मा. श्री. सुरेशदादा जैन हे महाराष्ट्रातील सुविख्यात व्यक्तिमत्व आहे. आदरणीय दादा हे राजकरण, शैक्षणिक,सामाजिक बांधिलकी,आरोग्य, क्रीडा, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रात लक्षणीय बदल घडविण्यासाठी अविरत कार्य करीत आहेत.
- जळगाव जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु उत्तम शैक्षणिक क्षमता असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सोबतच प्रशिक्षण व इतर विद्यार्थी-केंद्रित लाभ मिळावेत यासाठी २००८ मध्ये "सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना" म्हणजेच SD-SEED ही योजना सुरु करण्यात आली.
- एसडी-सीडच्या अध्यक्षा दादांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रत्ना जैन, कार्याध्यक्षा मीनाक्षी जैन आणि डॉ. प्रसन्नकुमार रेदासनी, अध्यक्ष-गव्हर्निंग बोर्ड ज्यामध्ये मार्गदर्शन व निवड समिती समाविष्ठ असलेल्या एकूण ३० प्रतिष्ठित व्यक्तींचा समावेश आहे. या सर्वांच्या द्वारे एसडी-सीडला योग्यरीत्या मार्गदर्शित  करण्यात येते.
- शिष्यवृत्तीसाठी आलेल्या प्रत्येक अर्जाची निवड समिती सखोल छाननी करून अर्जदाराच्या पात्रतेची खात्री करते. वेळप्रसंगी त्याच्या निवासस्थानी जाऊन परिस्थितीची पाहणी करते व शेवटी शिष्यवृत्तीची रक्कम योग्य व लायक विध्यार्थ्यालाच मिळावी याची सुनिश्चीती करते.
- सॉफ्ट स्किल आणि जीवन कौशल्य विकासासाठी विविध विषयांवर वर्षभर प्रशिक्षण दिले जाते. ज्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढून त्यांचा सर्वांगीण विकास होईल.
- समर इंटर्नशिपच्या माध्यमातून नोकरीचा अनुभव व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात ज्यामुळे उद्योजकीय कौशल्ये आत्मसात करून रोजगारक्षमता वाढेल.
- विद्यार्थ्यांच्या क्षमता, कौशल्य, शैक्षणिक आव्हानं यावर मेंटरशिप कार्यक्रमाच्या मदतीने  मार्गदर्शन करून कौशल्य वाढीसाठी पोषक वातावरण निर्मिती केली जाते.

# एसडी-सीडची ध्येयपूर्ती कडे वाटचाल

| | |
|---|---|
| विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीरूपी आर्थिक मदत | १४६५८ |
| विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षण पूर्ण | ३६८१ |
| विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांना प्रशिक्षण | ४५९९५ |
| विद्यार्थ्यांना सेवाभावी व्यक्तींकडून दत्तक | १९१ |
| शैक्षणिक संस्थांसोबत सहकार्य करार (MoU) | १३८ |

# विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम

| | |
|---|---|
| युवती सशक्तीकरण शिबीर | २६८३ |
| उद्योजकत विकास मार्गदर्शन | ६०० |
| वैयक्तिक मार्गदर्शन | २८८ |
| मेंटरद्वारे मार्गदर्शन | १२१ |
| समर इंटर्नशिप | १० |

# महाराष्ट्राच्या नकाशावरील जळगाव



# महाराष्ट्राच्या तुलनेत जळगांव जिह्यातील साक्षरतेचे प्रमाण

| राज्य / जिल्हा | ग्रामीण साक्षरता प्रमाण (%) | | शहरी साक्षरता प्रमाण (%) | | एकूण साक्षरता प्रमाण (%) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **जनगणनेनुसार** | | **जनगणनेनुसार** | | **जनगणनेनुसार** | |
| | 2001 | 2011 | 2001 | 2011 | 2001 | 2011 |
| महाराष्ट्र | 70.36 | 77.09 | 85.48 | 89.84 | 76.88 | 82.91 |
| **जळगाव** | **72.10** | **76.04** | **83.62** | **87.51** | **75.43** | **79.73** |

*स्त्रोत:* **www.census2011.co.in**

*राज्यस्तरीय साक्षरता जुळण्यासाठी जळगावमधील साक्षरतेचे प्रमाण सुधारण्यासाठी वाव आहे.*

# संस्थेची संरचना

**सौ.रत्ना जैन**
**अध्यक्षा**

**डॉ.प्रसन्नकुमार रेदासनी**
अध्यक्ष

**मीनाक्षीताई जैन**
कार्याध्यक्षा

**एसडी-सीड असोसिएट**

## गव्हर्निंग बोर्ड

- डॉ. एस.एस.राणे
- डॉ.सुरेश अलीझाड
- प्रा. नंदलाल गादिया
- डॉ. रानिदास डाकलिया
- श्री. महेश गोरडे
- श्री.राजेश यावलकर
- श्री. निळकंठ गायकवाड
- श्री. सागर पगारिया

## मार्गदर्शन समिती

- श्री. अजित कुचेरिया
- डॉ.अजित वाघ
- श्री. अनिल राव
- श्री. शिरीष बर्वे
- श्री. जी.टी.महाजन
- डॉ.डी.टी. नेहते
- श्री. दादा नेवे
- डॉ. विवेक काटदरे
- डॉ.गौरी राणे
- प्रा. सुरेश पांडे
- श्री. रवी टाले
- श्री. नरेंद्र जैन
- सौ.पुष्पा भंडारी
- डॉ.एस.पी.बडगुजर
- श्री.सुभाष लोढा
- प्रा. एस.व्ही. सोमवंशी
- प्रा.उत्तम पाटील
- डॉ. विजय माहेश्वरी
- श्री. उमेश सेठिया
- प्रा. संजय दहाड
- श्री. विक्रांत सराफ

## तालुका समन्वयक

- श्री. प्रेमचंद कोटेचा , **भुसावळ**
- श्री. नितीन बिर्ला , **एरंडोल**
- श्री. चिमण (आबा ) पाटील, **पारोळा**
- श्री. पप्पुशेठ बडोला ,**पाचोरा**
- श्री. शैलेश जाजू ,**धरणगाव**
- श्री. गोविंददादा मुंडदे, **अमळनेर**
- श्री. सुरेश अलीझाड , **चोपडा**
- श्री. सुरेशचंद्र धारीवाल , **जामनेर**
- श्री. चित्रसेन पाटील , **चाळीसगाव**
- श्री. अजितकुमार रेदासनी , **मुक्ताईनगर**
- श्री. सुरेश भंडारी, **भडगाव**
- श्री. चंद्रकांत चौधरी, **यावल**
- श्री. बबनलाल अग्रवाल, **रावेर**
- श्री. विनोद कोटेचा, **बोदवड**

SEED

[www.sdseed.in](http://www.sdseed.in)



16 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

# आमचा प्रमुख कार्यक्रम
# 'मातोश्री प्रेमाबाई जैन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती'

**नवीन अर्जदारांसाठी निवडीचे निकष:**

- विद्यार्थी जळगाव जिल्ह्यातील रहिवासी असावी.
- विद्यार्थ्याने दहावी व त्यापुढील परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
- कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. २,००,०००/—
- दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थ्यांना विशेष प्राधान्य दिले जाईल.
- शिष्यवृत्ती मिळण्यासाठी गुणांची पात्रता खालीलप्रमाणे असणे आवश्यक:

| अ.क्र. | रहिवास | इयत्ता १० वी अपेक्षित गुण | इयत्ता १२ वी अपेक्षित गुण |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण भागातील विद्यार्थी | ८५ % | ७० % |
| २ | शहरी भागातील विद्यार्थी | ९० % | ७५ % |
| ३ | दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थी | ७५ % | ६५ % |
| ४ | एम.एच-सीईटी | NA | १२० गुण |

## *आमचा प्रमुख कार्यक्रम*

## 'मातोश्री प्रेमाबाई जैन उच्च शिक्षण शिष्यवृत्ती'

### नुतनीकरण अर्जदारांसाठी निवडीचे निकष :

- विद्यार्थी (ड्रॉप-आउट विद्यार्थ्यांसह) एसडी-सीड शिष्यवृत्ती लाभार्थी असावा.
- विद्यार्थी मागील शैक्षणिक वर्षातील परीक्षा उत्तीर्ण असावा.
- विद्यार्थ्यास फक्त एका विषयात ATKT मिळालेला असावा.

### गुणांची पात्रता

अ. इयत्ता १२ वी ते पदवी (प्रथम वर्ष) : किमान ७५ टक्के

ब. डिप्लोमा (तृतीय वर्ष) ते पदवी : किमान ७५ टक्के

क. पदवी ते पदव्युत्तर : किमान ७५ टक्के

- कौटुंबिक वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रु. २,००,०००
- दिव्यांग / एकल पालक / निराधार विद्यार्थ्यांना विशेष प्राधान्य दिले जाईल.

# दत्तक शिष्यवृत्ती योजना आणि शिष्यवृत्ती परतफेड योजना

- अनेक व्यक्ती आणि संघटनांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु उत्तम शैक्षणिक क्षमता असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याच्या थोर कार्यात आमच्याशी सहकार्य करण्याची त्यांची मनापासून इच्छा व्यक्त केली म्हणून **'दत्तक शिष्यवृत्ती योजना'** सुरू करण्यात आली.
- आमच्या अनेक माजी लाभार्थ्यांनी देखील विद्यार्थ्यांना आर्थिक मदतीच्या माध्यमातून किंवा त्यांना शिकविण्यासाठी वा मार्गदर्शनासाठी वेळ देवून एसडी–सीडची परतफेड करण्याची कृतज्ञता व्यक्त केली आणि म्हणून **'शिष्यवृत्ती परतफेड योजना'** सुरू करण्यात आली.
- वरील दोन्ही शिष्यवृत्ती योजनेसाठी लाभार्थ्यांच्या निवडीचे निकष 'मातोश्री प्रेमाबाई जैन शिष्यवृत्ती' प्रमाणेच असतील आणि त्याच निवड समितीद्वारे अर्जांची तपासणी करण्यात येईल.
- देणगीची रक्कम विद्यार्थी शिकत असलेल्या अभ्यासक्रमानुसार प्रति वर्ष रू.5000 ते रू.65000 पर्यंत असू शकते.
- सर्व लाभार्थ्यांचा ऑनलाईन प्रोग्रेस रिपोर्ट जतन करण्यात येतो.

***"एक छोटासा आधार... करी गुणवंतांचा उद्धार"***

# विद्यार्थी हिताचे कार्यक्रम

- एसडी–सीड विद्यार्थ्यांच्या हितासाठी शिष्यवृत्ती, प्रशिक्षण आणि इतर कार्यक्रमांसह अशा पोषक वातावरणाची निर्मिती करीत आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक ध्येय सहजरित्या साध्य होण्यास मदत होईल.

- हे करण्यासाठी एसडी–सीड सर्व हितधारकांच्या समग्र सक्रिय समुदायाची बांधणी करीत आहे.

# विद्यार्थी हिताचे कार्यक्रम (Cont’d)

**1. आर्थिक सहाय्य योजना**

- मातोश्री प्रेमाबाई जैन शिष्यवृत्ती
- दत्तक शिष्यवृत्ती
- शिष्यवृत्ती परतफेड

**2. लाभार्थी हिताचे कार्यक्रम**

- गणवेश व पुस्तकांचे वाटप
- बॅंक, सरकारी आणि इतर योजनांद्वारे शैक्षणिक कर्ज
- इतर शहरांमधील हॉस्टेल्सची माहिती
- विविध ग्रंथालयांची माहिती
- कोचिंग क्लासेस फी, पुस्तक खरेदी, गणवेश, स्टेशनरी आणि इतर शैक्षणिक साहित्य खरेदीवर सवलत
- ज्ञान–यज्ञ (ई–न्यूजलेटर)

**3. तज्ज्ञ समुपदेशकांकडून करिअर मार्गदर्शन**

# विद्यार्थी हिताचे कार्यक्रम (Cont'd)

**4. प्रशिक्षण कार्यक्रम**

- विद्यार्थी मूल्यांकन कार्यक्रम
- स्पर्धात्मक आणि सार्वजनिक परीक्षांसाठी प्रशिक्षण
- परीक्षा प्रवेश प्रक्रिया माहिती
- प्रतिष्ठित व्यक्तींकडून प्रेरणादायी भाषण
- कौशल्य विकास प्रशिक्षण
- मूल्य शिक्षण
- विज्ञान अनुभव
- शिक्षकांना प्रशिक्षण
- पालकांचे समुपदेशन

**5 उद्योजकता विकास मार्गदर्शन**

**6 मेन्टरशिप प्रोग्राम**

**7 समर इंटर्नशीप**

**8 'स्मार्ट गर्ल' प्रशिक्षण कार्यक्रम**

**9 एसडी–सीड अभ्यासिका**

**10. माजी लाभार्थी मेळावा (Pride Alumni Meet)**

# विविध सहायतांची उपलब्धी

एसडी–सीडने लाभार्थ्यांना आकर्षक सवलत मिळावी म्हणून विविध संस्थांसोबत करार केले आहेत, ज्यामुळे जिल्ह्यात सर्वांगीण विकास घडून येत आहे.

| सवलतीचा प्रकार | करार केलेल्या संस्थांची संख्या |
|---|---|
| **बँक** (शैक्षणिक कर्ज सहायतेसाठी) | **45** |
| **वसतीगृहे** | **3** |
| **ग्रंथालये** | **3** |
| **कोचिंग क्लासेस** | **51** |
| **पुस्तक दुकाने** | **27** |
| **नोकरी सहायता** | **1** |
| **समर इंटर्नशीप** | **8** |
| **एकूण** | **138** |

# प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन (डिसेंबर 2023 पर्यंत)

## (प्रशिक्षण कालावधी – जानेवारी ते डिसेंबर)


| प्रशिक्षण विषय | आयोजित कार्यक्रमांची संख्या |
|---|---|
| कौशल्य विकास | १३३ |
| अभ्यासाचे महत्व | २४ |
| मुलाखत कौशल्य | ४१ |
| करिअर मार्गदर्शन, प्रेरणादायी व्याख्यान आणि वैयक्तिक समुपदेशन | ४३ |
| स्मार्ट गर्ल आणि युवती सशक्तीकरण | ३५ |
| वेळेचे व्यवस्थापन | २४ |
| ध्येय निश्चिती व संपादन | २२ |
| परिक्षेला सामोरे कसे जावे? | १९ |
| सीईटी परीक्षेसाठी मार्गदर्शन | ०८ |
| पालकांचे समुपदेश व शिक्षकांना प्रशिक्षण | ०९ |
| योगाचे महत्व | ०३ |
| मुल्यशिक्षण व विज्ञान अनुभव | १० |
| उद्योजकिय मार्गदर्शन कार्यशाळा | ०४ |
| विद्यार्थी मुल्यांकन कार्यक्रम | ०१ |
| इंव्हेस्टर बुटकॅम्प | ०१ |
| आर्थिक नियोजन | ०२ |
| एकूण | ३७९ |

| सहभागी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर, पालक व शिक्षक | सहभागी विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| पोस्ट–ग्रॅज्युएशन | ३८०० |
| ग्रॅज्युएशन | १४१२९ |
| इयत्ता 11 व 12 | ११२६५ |
| इयत्ता 8 ते 10 | १५५०८ |
| पालक व शिक्षक | ३३० |
| पालक, शिक्षक व विद्यार्थी (वेबिनार) | ९६३ |
| एकूण | ४५९९५ |

** कौशल्य विकास प्रशिक्षणामध्ये पुढील विषयांचा समावेश केला जातो. जसे – व्यक्तिमत्व विकास, प्रभावी संवाद, इंग्रजी बोलणे, श्रवण कौशल्य, स्मृती आणि एकाग्रता विकास, इत्यादी.*


*(संबंधित क्षेत्रातील तज्ज्ञांद्वारे प्रशिक्षण देण्यात येते)*

# वर्ष निहाय शिक्षण पूर्ण केलेले लाभार्थी २००९ ते २०२३




## शिक्षण पूर्ण झालेले एकूण लाभार्थी - ३६८१

# 2008 पासून दिलेल्या शिष्यवृत्तीची शाखा निहाय टक्केवारी





२००८ ←→ २०२३

*सर्वाधिक लाभार्थी इंजिनीअरींग शाखेतील आहेत.*

**Total No. of Beneficiaries: १४६५८**

# शिक्षण पूर्ण केलेल्या लाभार्थ्यांची शाखा निहाय टक्केवारी




*सर्वाधिक शिक्षण पूर्ण झालेले लाभार्थी इंजिनीअरींग शाखेतील आहेत.*

**Total No. of Pass-out Beneficiaries: ३६८१**

SEED

16 YEARS EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

# सर्वोत्तम कार्य

- ड्रॉप आउट प्रमाण कमी करणे.
- प्रशिक्षणपूर्व आणि प्रशिक्षणानंतरचे मूल्यांकन.
- MOU - क्लासेस आणि पुस्तक विक्रेत्यांसोबत सहकार्य करार.
- समर इंटर्नशिपसाठी नामांकित संस्थांमध्ये संधी.
- शिष्यवृत्ती परतफेड आणि दत्तक शिष्यवृत्ती योजना.

# नियोजित उपक्रम

- मेंटोरशिप प्रोग्राम द्वारे विद्यार्थ्यांना मानसिक आणि भावनिक आधार देणे.
- करिअर समुपदेशनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भावी करिअर निवडण्यास मदत करणे.
- सॉफ्ट स्किल आणि जीवन कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण देणे.
- विद्यार्थ्यांना समर इंटर्नशिपची संधी मिळवून देण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण संस्थांसोबत सहकार्य करार करणे.
- विद्यार्थ्यांना नवीन उद्योग उभारणीसाठी सरकारी धोरणांबाबत मार्गदर्शन करणे.

# आव्हाने

- विद्यार्थ्यांचे ड्रॉप–आऊट प्रमाण
- शिक्षण घेताना प्राधान्याने येणारे आर्थिक विषय
- मुलांनी शिक्षण पूर्ण करण्यासाठी त्यांना प्रेरित करण्यास पालक अक्षम
- पालक–शिक्षक–विद्यार्थी यांच्यातील परस्पर संबंधाचा अभाव
- विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधणे कठीण
- विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, इंग्रजी बोलणे व विविध कौशल्ये विकसित करणे

# पुढील प्रक्रिया

- पालक-शिक्षक-विद्यार्थी यांच्यात संवाद होण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करणे.
- सर्व लाभार्थी व सहकारी यांचा डिजिटल समुदाय तयार करणे.
- शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी कार्य करणे.
- शिक्षण मेळावा
- प्लेसमेंट सेल

# प्रमुख कार्यक्रम - 2022 ते 2023




2023




2023




2022




2022

# प्रमुख कार्यक्रम – 2017 ते 2021



2017



2018



2020



2021

# प्रमुख कार्यक्रम – 2013 ते 2016

2013



2014



2015




2016






16 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development
सुरेशदादा शैक्षणिक व उद्योजक विकास योजना

# प्रमुख कार्यक्रम – 2008 ते 2011


2008



2009


2010


2011

SD SEED



16 YEARS
EMPOWERING STUDENTS SINCE 2008
Suresh Dada Scheme for Educational & Entrepreneurial Development

# शिष्यवृत्ती सोहळ्याप्रसंगी मान्यवरांचे प्रेरणादायी विचार (2013 ते 2023)

## प्रमुख पाहुणे – 2023



**डॉ. श्री. आनंद कुमार** संचालक – सुपर 30, पटना

- 'अपयशच'मोठी संधी देते त्यामुळे कुठल्याही परिक्षेला वयाच्या बंधनात अडकवू नका.
- शिक्षणाला आणि आयुष्याला क्षणिक सुखात मापू नका, दुरदृष्टीतून भविष्यात उजेड पेरण्याचा प्रयत्न करा.
- पालकांनी बदल स्विकारला पाहिजे, मुलांना निर्णय घेवू द्या, त्यांना प्रेरणा द्या.
- माहितीयुक्त ज्ञान स्वविकासातून निर्माण होते आणि तेच ज्ञान संधी निर्माण करते म्हणून विद्यार्थ्यांनी प्रयोगशिलतेला वाव द्यावा.

## प्रमुख पाहुणे – 2022



**डॉ. सौ. सुषमा पी विरमणी** – संचालक – रामानुजन इंस्टिटयुट, चेन्नई

- एसडी–सीड करीत असलेले काम अभूतपूर्व आहे. अशा महान संस्थेचा लाभ इतर जिल्हयातील विद्यार्थ्यांनाही मिळावा अशी माझी इच्छा आहे.
- विद्यार्थ्यांनी कधीही आत्मविश्वास गमावू नये आणि सदैव आनंदी रहावे.
- नेहमी मानवी मुल्यांना महत्व द्यावे व एक चांगला माणूस व्हावे हे अत्यंत महत्वाचे आहे.

## प्रमुख पाहुणे – 2021



**श्री. विश्वासराव पाटील** – ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत, शहादा

- विद्यार्थ्यांनी किंमतीच्या जगातून निघून मुल्यांच्या जगात यायचे आहे आणि तिथेच न थांबता उदात्त मुल्यांच्या जगात यायचे आहे.
- 'दातृत्व ही जगातील सर्वात मोठी शक्ती आहे.
- मी गरीब असेल, साधारण परिस्थिती असेल तरी खचून न जाता आत्मविश्वासाने त्याला सामोरे जा.
- शिक्षणामुळेच आपण मैत्री जोपासायला शिकतो आणि त्याच्या मुळेच आपल्याला मान–सन्मान मिळत असतो.
- जीवनमुल्यांचा आपण स्विकार केला पाहिजे कारण मुल्ये माणसाला जगणे शिकवितात.

## प्रमुख पाहुणे – 2018



**श्री. हणमंतराव गायकवाड,** संस्थापक – भारत विकास ग्रुप, मुंबई

- गुणवत्तेत कुठलीही तडजोड न करता निरीक्षण व सामान्य ज्ञान जाणून घ्या.
- 'जगात ब–याच प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध असून असे काही करा ज्यातून समाजहित, देशहितासोबत तुमचे आयुष्य सुद्धा घडेल.
- दररोज काही नवीन शिकण्याचा प्रयत्न करा. जगाच्या पाठीवर कुठेही काम करण्याची तयारी ठेवा आणि आपल्या कामाशी प्रामाणिक राहा.
- आजच्या जगात नुसते उत्तम असणे पुरेसे नाही तर कायम सर्वोत्तमच असले पाहिजे.



**श्री. विजय दर्डा,** अध्यक्ष – लोकमत मिडीया प्रा. लि., नागपूर

- गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करून शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यात येते.
- शिक्षण हे एकच असे माध्यम आहे, ज्याद्वारे सुसंस्कृत देश घडू शकतो तसेच संपूर्ण जग बदलू शकते. आणि माध्यमातून पुढे सुंदर भारतासाठी सुंदर विधाता घडू शकतो.
- आपल्या देशाची ओळख ही तिच्या संस्कृतीवरून होत असते. आपल्या संस्कृतीतील प्रत्येक गोष्टीला वैज्ञानिक महत्त्व प्राप्त झाले असून या संस्कृतीचा देशभरात सन्मान केला जातो. त्यामुळे ती टिकविण्यासाठी व देशाच्या विकासासाठी मुलांसह मुलींना देखील शिक्षण दिले पाहिजे.

# प्रेरणादायी विचार (Cont'd)

## प्रमुख पाहुणे – 2017



**श्री. अविनाश धर्माधिकारी,** माजी सनदी अधिकारी व संस्थापक – चाणक्य मंडळ परिवार पुणे

जीवन आणि करिअर घडविण्याचे त्रिसूत्र

- 'स्वओळख'–प्रत्येकजण बुद्धिमान आहे, पण प्रत्येकाने आपली बुद्धी कुठे चालते ते ओळखले पहिजे. दुस–याकडे पाहून कोणत्या क्षेत्रात जायचे, हे ठरवू नका.
- 'स्वनिर्णय' – स्वतःचे मन कशात रमते व स्वतःची क्षमता यावर क्षेत्र निवडा. जीवनाची दिशा त्यानुसार ठरवा व जागतिक स्पर्धेत तयार व्हा.
- 'समर्पित' – जागतिक पातळीवरील स्पर्धेचा विचार करून निवडलेल्या क्षेत्रात पूर्णपणे पारंगत, उत्तम व प्रतिभावंत व्हा. त्या क्षेत्रासाठी स्वतःला समर्पित करा, यशस्वी जीवनाची पायाभरणी या टप्प्यातच होते.

## प्रमुख पाहुणे – 2016



**डॉ. राजन वेळूकर,** माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

- विद्यार्थ्यांनी ही मदत एक संधी म्हणून पाहावी आणि त्याद्वारे विकास साधावा. मुख्य म्हणजे शिक्षण आणि विकास यांचा परस्पर संबधं आहे. कारण जितके जास्त शिक्षण तेवढा देशाचा विकास जास्त होतो.



**प्रा. पी.पी. पाटील,** कुलगुरू, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ

- श्री. सुरेशदादा जैन यांनी हा उपक्रम जातीपातींपलीकडे राबवून शिक्षणासंबंधी मोठे काम हाती घेतले आहे.
- गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी आर्थिक विवंचनेतील विद्यार्थ्यांना याद्वारे मदत मिळते व त्यांच्या अडचणी दूर होतात.



**प्रा. प्रकाश पाठक,** कार्यकारी संचालक, भोसला मिलीटरी स्कूल, नाशिक

- उद्याची जीवनाची सूत्रे समजून घेताना विद्यार्थ्यांनी जगातील ज्ञानाच्या मागे झपाटल्यासारखे लागावे.
- शिष्यवृत्ती हा निधी आहे, मात्र तो देण्यामागे ज्यांचा भाव असतो तो ओळखणे महत्त्वाचे आहे.

# प्रेरणादायी विचार (Cont'd)

## प्रमुख पाहुणे – 2015



**डॉ. पंडीत विद्यासागर,** कुलगुरू, मराठवाडा विद्यापीठ

- परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता विकसित करा. स्वयंशिस्त लावा त्यामुळे यश मिळेल.
- संधी सांगून येत नाही त्यामुळे मिळालेल्या संधीचा सदुपयोग करा.



**डॉ. गिरीश कुलकर्णी,** संस्थापक व अध्यक्ष, स्नेहालय, अहमदनगर

- वंचितांना मदत करणे म्हणजे माणुसकीचा धर्म पाळणे होय.
- सुरेशदादांचे हे विद्यार्थ्यांच्या आत्मीयतेपोटी सुरू असलेले कार्य अतिशय निःस्वार्थ आहे. अशा कार्याची आज देशाला आवश्यकता आहे.

## प्रमुख पाहुणे – 2014



**डॉ. आनंद कर्वे,** नामांकित वैज्ञानिक

- आजची जी शिक्षणपद्धती आहे, त्यात विद्यार्थ्यांची जी नवीन विचार करण्याची शक्ती आहे ती मारून टाकली जात आहे. यावर मात करून नव्या विचारांची व्याप्ती अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे.
- जगात जी नवकल्पना मांडली, ती भारताने मांडली आहे. त्यामुळे नवीन संशोधक वृत्ती जोपासा, नवनिर्मिती व नवविचारांचा मार्ग पत्करा.



**डॉ. सुनिलकुमार लवटे,** संशोधक व लेखक

- भारत पुढील काही वर्षात महासत्ता बनू शकतो, यासाठी तरुणांनी पुढे येवून योगदान देणे महत्त्वाचे आहे.
- समाजात विविध माध्यमातून मदत करणाऱ्या दातृत्वामुळे अनेक गरजूंना आधार मिळत असतो.
- महान व्यक्तींच्या सान्निध्यात राहा. मिळालेल्या शिष्यवृत्तीचा उपयोग उत्तम करा.

# प्रेरणादायी विचार (Cont'd)

## प्रमुख पाहुणे – 2008 ते 2013



**डॉ. शंकर पुणतांबेकर,** ज्येष्ठ साहित्यिक – **प्रमुख पाहुणे, 2013**

- शिंपल्यात पडणारा पाण्याचा थेंब मोती होतो आणि तोच थेंब सापाच्या तोंडात पडला तर त्याचे विष होते. याप्रमाणे दादांनी सुरू केलेल्या या योजनेतून शिष्यवृत्ती प्राप्त केलेल्या शेकडो विद्यार्थ्यांचे मोती होणार.



**डॉ. रघुनाथ माशेलकर,** प्रसिद्ध वैज्ञानिक – **प्रमुख पाहुणे, 2011**

- विद्यार्थ्यांनी यशाने हुरळून जावू नये.
- प्रयत्नांच्या पराकाष्ठेने यशाचे शिखर गाठल्यास जळगावातील व्यक्तीला नोबेल पारितोषिक मिळू शकते.



**डॉ. नरेंद्र जाधव,** सदस्य–नियोजन आयोग, भारत सरकार – **प्रमुख पाहुणे, 2010**

- तुमचे ध्येय निश्चित करा आणि ते नक्कीच साध्य कराल असा प्रचंड विश्वास तुमच्यामध्ये असायला हवा.
- परिश्रमाला पर्याय नाही. वेळेचे चांगल्या प्रकारे नियोजन करा.
- पालकांचा आदर करा. सामाजिक जबाबदारी लक्षात ठेवा व नेहमी सकारात्मक विचार करा.



**डॉ. एन.के. ठाकरे,** माजी कुलगुरू–उमवि – **प्रमुख पाहुणे, 2009**

- रडणाऱ्याला हसवणं, पडलेल्याला उठवणं, गरजवंताला मदत करणं हीच खरी ईश्वरसेवा आहे.
- गरीब, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती सुरु करून मा. सुरेशदादा खऱ्या अर्थाने ईश्वरसेवा करीत आहेत.



**श्री. एम.बी. शाह,** ज्येष्ठ साहित्यीक व गांधीवादी विचारवंत – **प्रमुख पाहुणे, 2008**

- त्याग आणि मूल्यांवर आधारित असलेले राहणीमान एक चांगला नागरिक बनविते.

# आमचे काही नेत्रदीपक यशस्वी लाभार्थी २०२२



**महिमा अनिल पाटील**
**बी.ई.इलेक्ट्रिकल – चतुर्थ वर्ष**
गोल्ड मेडल आणि उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठात प्रथम क्रमांक



**सुरज संजय पाटील**
**बी.ई. सिव्हील - चतुर्थ वर्ष**
राष्ट्रीय स्तर - स्मार्ट इंडिया हेटकॉन
स्पर्धा प्रथम क्रमांक आणि विजेता



**श्रद्धा संजय सोमवंशी**
**अकरावी सायन्स**
दहावी शालांत परीक्षा ९७.८ %
गुणांनी उत्तीर्ण



**जया भास्कर साळुंखे**
**बी.एस्सी. – तृतीय वर्ष**
संगीत विशारद अभ्यासक्रम
यशस्वीपणे पूर्ण



**गौरी अरविंद काळे**
**बी.ई. सिव्हील – चतुर्थ वर्ष**
गोल्ड मेडल आणि उत्तर महाराष्ट्र
विद्यापीठात प्रथम क्रमांक



**निखील यशवंत भगत**
**बी.ई. E & TC - चतुर्थ वर्ष**
राज्य स्तरीय माईलस्टोन पेपर
प्रेसेंटेशन स्पर्धा प्रथम क्रमांक



**वैभव संजय बिचवे**
**बी.ई आयटी – तृतीय वर्ष**
बी.ई. आयटी द्वितीय वर्षाला
९७.१ % गुणांनी उत्तीर्ण



**ऋषिकेश ज्ञानेश्वर बारी**
**एस.वाय.जे.सी (सायन्स)**
जळगाव जिल्हा स्तरीय खो-खो
संघात निवड

# २०२२ च्या लाभार्थ्यांचे एसडी-सीड बद्दलचे मत----



**तायडे प्रेरणा संजय - भुसावळ - B.H.M.S (Second Year)**

मी प्रेरणा संजय तायडे मेडिकलच्या द्वितीय वर्षाला शिकत आहे. माझे वडील हात मजुरी करतात. आर्थिक परिस्थिती बिकट आहे. माझे डॉक्टर होण्याचे स्वप्न आर्थिक परिस्थितीमुळे पूर्ण होईल की नाही याची भीती वाटत होती. परंतु मा. सुरेशदादा जैन यांच्या प्रेरणेतून साकार झालेल्या एसडी-सीडमुळे मला फार मोठा आर्थिक आधार मिळाला. त्यामुळेच मेडिकलसाठी प्रवेशही घेता आला. आदरणीय सुरेशदादा जैन यांच्या विद्यार्थ्यांप्रती असलेल्या तळमळीमुळे एक साधारण कुटुंबातील मुलगी डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहून ते पूर्ण करू शकते असा आत्मविश्वास निर्माण झाला.



**अहिरे योगिता सिद्धार्थ - जळगाव - B.Com (First Year)**

मी लहान असतांनाच वडिलांचे छत्र हरपले. आई हातमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत आहे. या शिष्यवृत्तीमुळे माझ्या उच्चशिक्षणाच्या स्वप्नांना एक आधार मिळाला. आता कोणत्याही आर्थिक अडचणीची भीती वाटत नाही. चांगला अभ्यास करण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. शिक्षणाची जिद्द असलेल्या आम्हा विद्यार्थ्यांना आता नवी दिशा मिळाली आहे. वडिलांचे निधन झाले असले तरी ~~पण~~ एसडी-सीड च्या माध्यमातून मा. दादांचा वडील रुपी हात माझ्या पाठीवर असल्याने माझ्या सारखे असंख्य विद्यार्थी चिंतामुक्त आहेत.भविष्यात स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी बनण्याचा मानस असून ते स्वप्न नक्कीच पूर्ण होईल असा आत्मविश्वास निर्माण झाला आहे.



**खेंटे शुभम सुनील - जळगाव - Bachelor in Hotel Management (Second Year)**

शिक्षण घेत असतांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीपुढे हतबल व्हावे लागते तर कित्येक मुलांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. अशीच काहीशी परिस्थिती माझी होती. लहान असतांना वडिलांचे निधन झाल्याने आईने दवाखान्यात काम करून आमचा सांभाळ केला. डोळ्यांसमोर सर्वत्र अंधार असतांना आ. सुरेशदादा जैन यांच्या माध्यमातून एसडी-सीडच्या रूपाने एक दीप प्रज्वलित झाला व त्यामुळे मला शिक्षण घेण्यासाठी नवी दिशा मिळाली. मी शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी झाल्यावर मा. दादांची देण्याची वृत्तीचा अंगीकार करून अनेक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीसाठी यथार्थ मदतीचा हात देईल.



**मराठे भूषण आत्माराम - धरणगाव - Diploma Computers (Third Year)**

मी सध्या डिप्लोमा कॉम्पुटरच्या तृतीय वर्षाला शिकत आहे. मी एक मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी असून वडील शेतमजुरी करतात. आर्थिक परिस्थिती जेमतेम असतांना एसडी-सीडची शिष्यवृत्ती कल्पतरू सारखी माझ्या मदतीला धावून आली. मलाच नव्हे तर अनेक विद्यार्थ्यांना समाजातील प्रत्येक क्षेत्रातील पोकळी भरून काढण्याची क्षमता असणार्या मा. दादांच्या रूपाने प्रेरणादायी व्यक्तिमत्वाचा सहवास आणि मदत मिळत आहे याचा आनंद वाटतो. एसडी-सीडच्या मदतीने कोणत्याही आर्थिक अडचणींशिवाय खेडेगावातील सामान्य विद्यार्थी शहरात शिक्षण घेऊ शकतो हे सिद्ध झाले. आपण माझ्या पंखांना बळ दिलेत त्यामुळे मुक्त आकाशात उंच भरारी घेण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. मा. दादांना दीर्घायुष्य लाभो आणि हे सत्कर्म असेच निरंतर चालू राहो हीच इच्छा व्यक्त करतो.

# निष्कर्ष

- चांगले शिक्षण व्यक्तीचे चारित्र्य घडविते.
- चांगले शिक्षण जीवन सुसंस्कारित व सुसंस्कृत करते.
- चांगल्या शिक्षणामुळे महत्त्वाकांक्षी संधी निर्माण होतात.
- चांगल्या शिक्षणामुळे एक चिरंतन समाज निर्माण होतो.
- चांगले शिक्षण मानवता टिकून राहण्यासाठी आवश्यक आहे.
- एसडी–सीड वंचित मुलांना चांगले शिक्षण देणे.
- एसडी–सीड सर्वांचे भविष्य उज्ज्वल व्हावे यासाठी बांधणी करीत आहे.

# धन्यवाद